# ह. भ. प. श्री. मुकुंदराज मडगांवकर : कीर्तनकार लेखक

**– प्रा. वासुदेव सावंत**

'हरिभक्त-परिषद' या कीर्तनकारांच्या संस्थेचे अध्यक्ष ह. भ. प. माननीय श्री मुकुंदराज मडगांवकर गोमंतकातील ख्यातकीर्त ज्येष्ठ कीर्तनकार आहेत. कीर्तन हा नवविधा भक्तीपैकी एक प्रकार असल्याने कीर्तनकार हा ईश्वरभक्तीच्या मार्गावरचा एक प्रवासी आणि मार्गदर्शक जसा असतो तसा कथन-निरूपणाची कौशल्ये आत्मसात केलेला एक कलावंतही असतो. गायन, नृत्य, अभिनय इत्यादींनी परिपूर्ण असलेली कीर्तन ही सर्वश्रेष्ठ कला आहे असे श्री. मडगांवकर यांनीच एके ठिकाणी म्हटलेले आहे, ते सर्वमान्य होण्यासारखेच आहे. पण गायन, नर्तन, वक्तृत्व इ. च्या जोडीलाच आणखीही एक कौशल्य कीर्तनकाराकडे असते. श्रोत्यांपुढे जे निरूपण करायचे, जे कथ्य किंवा आशय मांडायचा तो शास्त्र-पुराणादी ग्रंथांतून किंवा संतांच्या काव्यरचनातून घेतलेला असला तरी त्या मुळ आशयाच्या स्पष्टीकरणासाठी स्वतःच्या काही रचनांचा, लेखनाचाही काही वेळा आधार घ्यावा लागतो. ईश्वर भक्तीचे आणि लोकशिक्षणाचेही माध्यम म्हणून कीर्तनाचे महत्त्व आजच्या बदलत्या काळातही टिकून असले तरी मौखिक रूपाने कीर्तनातून जे सांगितले जाते ते लिखित किंवा मुद्रितासारखे स्थायी स्वरूपाचे नसते. म्हणून अनेक कीर्तनकार लेखनकलाही आत्मसात करीत असतात. श्रोत्यांना जे सांगायचे ते अक्षरबद्ध करून ठेवत असतात. कीर्तनातील निरूपणाचा आधार ग्रंथगत असला तरी कीर्तनातील पदे, श्लोक इ. रचना काही कीर्तनकारांनी स्वतः केलेल्या असतात. संस्कृत शास्त्र-ग्रंथातील आशय काहीवेळा स्वतः केलेल्या लेखनातून, रचनांतून वाचकां-श्रोत्यांपर्यंत पोहचवित असतात.

सर्वच कीर्तनकार असे रचनाकार नसले तरी कांहीच्या जवळ तरी ही लेखनकला असतेच. या संदर्भात संतकवी कै. दासगणू महाराज यांचे नाव अलिकडच्या काळातील एक उत्तम निरूपणकार आणि रचनाकार म्हणून घेतले जाते. ह. भ. प. श्री मडगांवकरही कीर्तनासाठी आवश्यक असणाऱ्या अन्य कलांबरोबरच लेखनकलाही साध्य असलेले असे कीर्तनकार आहेत. त्यांनी केलेले लेखन तुलनेने अल्प असून कै. दासगणू महाराजांप्रमाणे त्यांनी स्वतंत्रपणे कीर्तन-आख्याने रचलेली नाहीत किंवा एखाद्या मूळग्रंथावर विवरणात्मक असा ग्रंथही लिहलेला नाही. मात्र सर्वसामान्य भाविकांच्या दृष्टीने उपयुक्त ठरेल असे लेखन त्यांनी केलेले आहे. त्यांनी केलेल्या लेखनाचा परिचय करून देण्याचा प्रयत्न येथे केलेला आहे.

'श्री सद्गुरु आत्माराम महाराज चरित्र' आणि 'तुळशी पूजनाचे महत्तव' या दोन प्रकाशित पुस्तिका आणि कीर्तनकार स्नेहसंमेलनानिमित्त काढलेल्या स्मरणिकेतील चार लेख अशी त्यांची लेखनसंपदा माझ्यासमोर आहे. आत्माराम महाराजांचे चरित्र ही ओवीबद्ध रचना असून बाकीचे लेखन गद्यस्वरूप आणि गद्य-पद्य निश्चीत स्वरूपाचे आहे. या सर्वच लेखनामागे लोकशिक्षणाचा जसा हेतू आहे तसा सामान्यांना अध्यात्म आणि धर्माच्या मार्गावर नेण्याचाही हेतू आहे.

अध्यात्ममार्गाचा प्रारंभ जीवाला पडलेल्या 'कोऽहम्', मी कोण? या प्रश्नाने होतो आणि आत्मप्रतीची आल्यावर या प्रश्नाचे उत्तर मिळते. माणसाला हे आत्मज्ञान सद्गुरुशिवाय प्राप्त होत नाही. सद्गुरुशिवाय मुमक्षूला मुक्तावस्थेपर्यंत जाता येत नाही. सद्गुरूचे हे असाधारण महत्त्व ओळखून सर्वच संतांनी परोपरीने सद्गुरु महिमा सांगितलेला आहे. ह. भ. प. मुकुंदराज मडगांवकर यांनीही

आत्माराम महाराजांचे चरित्र लिहून सद्‌गुरुस्तवन केलेले आहे. गुरुबद्दलचा आपला अनन्यशरणभाव आणि कृतज्ञता व्यक्त केलेली आहे. श्री. आत्माराम महाराज हे श्री. मडगांवकरांचे 'गुरुणाम् गुरु.' पण ज्या जीवनमुक्त महाराजांकडून मडगांवकरांना गुरुपदेश लाभला ते जीवनमुक्त महाराज म्हणजे आत्माराम महाराजांचाच पुनरावतार असल्याने आत्माराम महाराजांचे चरित्र लिहून श्री. मडगांवकरांनी स्वतःच्या गुरुंचाच गौरव केलेला आहे.

या ओवीबद्ध चरित्रग्रंथाची रचना पारंपरिक अध्यात्मिक, धार्मिक ग्रंथाच्या पद्धतीची झालेली आहे. गणेश–सरस्वती, सद्‌गुरुवंदनाने चरित्राचा प्रारंभ होतो. आपण अज्ञान मंदमती असतो तरी सद्‌गुरुकृपेनेच हे चरित्र लिहिण्याची प्रेरणा मिळाल्याला विनयभाव व्यक्त करून सद्‌गुरुचे चरित्र लिहिणे हा 'आल्हाद बहु वाटे चित्ता' असा आल्हाददायी अनुभव असल्याचे सांगितले जाते. प्राकृत ग्रंथाची ज्ञानी जनांनी उपेक्षा करू नये असे विनवून मग आत्माराम महाराजांचे चरित्र सांगितले जाते. मुमुक्षू आत्मारामांची गुरु गोपाळनाथांची आकस्मिक होणारी भेट, गुरु गोपाळनाथांकडून त्यांना झालेली आत्मज्ञानप्राप्ती, त्यानंतर लोकोद्धारार्थ त्यांनी गोमंतकातून केलेला संचार, त्यांचा अनुग्रह प्राप्त झालेले त्यांचे गोमंतकीय शिष्य, शेवटी शके अठराशे सदोतीसमध्ये आत्माराम महाराजांची आत्मपदप्राप्ती आणि त्यांच्या अंतिम इच्छेनुसार त्यांच्या नित्यपूजेतील गणपती आणि शाळिग्राम यांच्या प्रतिष्ठापनेसाठी शिष्यांनी माळणेग्रामी केलेली मठस्थापना अशा मोजक्या घटनांच्या आधारे सद्‌गुरु आत्मारामांचे चरित्र संक्षिप्तपणे सांगितलेले आहे. आत्माराम महाराजांच्या सिद्धी सामर्थ्याचे दर्शन घडविणाऱ्या घटनांचे वर्णन जसे या चरित्रात येते त्याचप्रमाणे माळणे येथील मठात चालणाऱ्या वार्षिकोत्सवांचे वर्णनही तपशीलाने येते.

पण केवळ आत्माराम महाराजांचे चरित्र म्हणूनच श्री. मडगांवकरांची ही रचना महत्वाची ठरत नाही तर लोकप्रबोधन करण्याचा त्यांचा हेतूही या चरित्र लेखनातून स्पष्ट दिसतो. प्रपंचाच्या मायाजाळात गुंतलेल्या सामान्य माणसाला अध्यात्मसाधनेचा मार्ग आणि अध्यात्मसाधनेचे महत्व येथे सांगितलेले आहे. म्हणूनच अद्वैत म्हणजे काय, प्रकृतिमुळे या अद्वैतातून सृष्टीची निर्मिती कशी होते याचे विवेचन केलेले आहे. या विवेचनातून अध्यात्मशास्त्रातल्या संकल्पना सामान्य वाचकांना समजावून सांगितलेल्या आहेत, त्याचबरोबर आत्मसाधना करू पहाणाऱ्या व्यक्तिकडे कोणती योग्यता असली पाहिजे हेही सांगितले जाते. त्यामुळे श्री मडगावकरांनी लिहिलेले श्री. आत्माराम महाराजांचे चरित्र सर्वसामान्य साधकांच्या दृष्टीनेही उपयुक्त ठरणारे आहे. सद्‌गुरु आत्माराम महाराजांच्या चरित्राबरोबरच नित्य पठनासाठी 'आत्माराम महाराज नमस्काराष्टक' आणि आत्माराम महाराजांची आरतीही श्री मडगांवकरांनी लिहिलेली आहे. या ओवीबद्ध चरित्ररचनेत जागोजाग अर्थस्पष्टीकरणात्मक टिपा दिलेल्या असल्याने सामान्य वाचकांच्या दृष्टीने हा चरित्रग्रंथ अधिकच सुबोध ठरलेला आहे.

श्री. मडगांवकरांनी लिहिलेल्या 'तुळशीपूजनाचे महत्व' या पुस्तिकेत तुलसीविवाहाचा पूजाविधी कसा करावा याची माहिती दिलेली असून तुलसीपासून माणसाच्या जीवनात कोणते फायदे होतात हे सांगितलेले आहे. विष्णुदास नामा यांनी लिहिलेले 'तुलसीमहात्म्य' हे स्तोत्र अनेक हिंदूच्या–विशेषतः स्त्रियांच्या नित्यपठनात असतेच. पण मडगांवकरांनी लिहिलेली पुस्तिका त्यापेक्षा वेगळ्या प्रकारची आहे. यात प्रथम तुळसीला दैवतत्व कसे प्राप्त झाले याची पौराणिक कथा सांगितलेली असून नंतर तुळशीविवाह लावताना करावयाचा पूजाविधी संस्कृत मंत्रोच्चारासह दिलेला आहे. तुळशीला पाणी घालताना व प्रदक्षिणा घालताना म्हणावयाचे मंत्र दिलेले असून तुळशीच्या मंजिऱ्या व पाने तोडण्याची शास्त्रशुद्ध पद्धती कशी असते हे पद्यात्मक रचनेतून सांगितलेले आहे. शेवटी एक आयुर्वेदिक औषधी म्हणून कशी बहुगुणी आहे, हे स्पष्ट केलेले आहे. 'तुळशीपूजनाचे महत्व' ही पुस्तिका अशा प्रकारे सर्वसामान्यांना उपयुक्त ठरेल या दृष्टीनेच लिहिलेली आहे.

बाविसाव्या कीर्तनकार स्नेहसंमेलनाच्या स्मरणिकेचे संपादन श्री. मडगांवकर यांनी केलेले असून संमेलनाच्या अध्यक्षीय व उद्घाटनपर भाषणाबरोबरच कीर्तन या विषयाशी संबंधित विविध लेख स्मरणिकेत संपादित केलेले आहेत. या स्मरणिकेतील लेखनाची बहुतांश जबाबदारी श्री. मडगांवकर यांनीच उचलेली दिसून येते. त्यांनी लिहिलेल्या लेखांपैकी 'नारदीय कीर्तन–परंपरा' आणि 'देवर्षी नारद जन्मकथा' हे दोन लेख विशेष महत्त्वाचे म्हणावे लागतील. 'नारदीय कीर्तन परंपरा' या लेखात नारदांपासून सुरू झालेली ही कीर्तनक्तीची परंपरा मराठीत गेली शेकडो वर्षे कशी चालत आलेली आहे याचा ऐतिहासिक आढावा घेतलेला आहे. वारकरी कीर्तन, हरीदासी कीर्तन, रामदासी कीर्तन या कीर्तनप्रकारांची माहिती देऊन महिपती ताहराबादकर – मुक्तेश्वर आणि मोरोपंत – रामजोशी यांच्यापासून ते अलिकडच्या गोविंदबुवा होशिंग–विद्याशंकर भारती यांच्यापर्यंतच्या अनेक कीर्तनकारांनी कीर्तनपरंपरा कशी समृद्ध व विकसित केलेली आहे हे सांगितलेले आहे. शेवटी गोमंतकीय कीर्तनकार, त्यांची हरिभक्त परिषद ही संस्था आणि कपिलेश्वरी येथील कीर्तन विद्यालय यांची माहिती दिलेली आहे. कीर्तनाला येणारा आजचा श्रोता बदललेला असल्याने कालानुरुप कीर्तनाचे स्वरूपही बदलले पाहिजे, समाजातील आजचे अनीती व दुराचाराचे वातावरण ही कीर्तनाच्या दृष्टीने अनुकूल परिस्थितीच समजली पाहिजे असा महत्वाचा विचारही लेखाच्या शेवटी मांडलेला आहे. या लेखात महाराष्ट्र व गोमंतकातील अनेक कीर्तनकारांची माहिती दिलेली असली तरी काही नामांकित व लोकप्रिय कीर्तनकारांचा – उदा. संत कवी दासगणू महाराज व त्यांचे शिष्य हे हरिदासी परंपरेतील, तसेच वारकरी किर्तन परंपरेतील धुंडामहाराज देगलूरकर, कै. सोनोपंत दांडेकर, भारदेबुवा, देहूकर महाराज अशा काही महत्वाच्या कीर्तनकारांचा उल्लेख येणे आवश्यक होते असे वाटते.

कीर्तनभक्तीचे आद्य जनक नारदमुनी यांची श्री. मडगांवकर यांनी सांगितलेली जन्मकथा म्हणजे श्रीमद्भागवतातील काही श्लोकांचे संकलन करून त्यांचा मराठीतून केलेला अनुवाद होय. महर्षि व्यासांना भागवत रचण्याची प्रेरणा देताना नारदांनी त्यांना स्वतःची जन्मकथा सांगून भगवद्भक्तीचे महत्त्व सांगितले. भागवतातील या कथाभागाचा श्री. मडगांवकर यांनी श्लोकशः मराठीत अनुवाद केलेला आहे. नारदांच्या जन्मकथेबरोबरच नारदभक्तिसूत्रांचाही मराठी अनुवाद करून नारद – अष्टोत्तरशत नामावली व नारदांची स्वरचित आरतीही दिलेली आहे. अशा प्रकारे कीर्तनभक्तीचे जनक असणाऱ्या नारदांबद्दलचा श्रद्धाभाव व्यक्त करतानाच सर्वसामान्य वाचक – श्रोत्यांना नारदमहात्म्य व भक्तिमहात्म्यही समजावून सांगितलेले आहे.

कीर्तनकार स्नेहसंमेलनानिमित्त काढलेल्या या स्मरणिकेत वरील दोन लेखांशिवाय 'कीर्तनकार स्नेहसंमेलनाची वाटचाल' आणि 'श्री जीवनमुक्त महाराज मठ' असे आणखी दोन लेख श्री. मडगांवकरांनी लिहिलेले आहेत. गोमंतकीय कीर्तनकारांच्या १९८० पासून सुरू झालेल्या १ ल्या स्नेहसंमेलनापासून २२ व्या स्नेहसंमेलनापर्यंत प्रत्येक संमेलनाचे तपशील एका लेखात सांगितलेले आहेत. तर दुसऱ्या लेखात श्री मडगांवकरांचे गुरु श्री. जीवनमुक्त महाराज यांचे चरित्र थोडक्यात सांगून शिवोली येथील त्यांच्या मठाचे वर्णन केलेले आहे. हे दोन्हीही लेख वाचकांच्या माहितीत भर घालणारे अशा प्रकारचे आहेत.

श्री. मडगांवकरबुवांनी केलेले हे सर्व लेखन पाहिले तरीही लोकशिक्षण आणि लोकप्रबोधन हाच हेतू प्रत्यक्ष – अप्रत्यक्षपणे त्यांच्या लेखनामागे आहे असे दिसून येते. म्हणूनच आपल्या गुरुपरंपरेबद्दलचा श्रद्धाभाव व्यक्त करण्यासाठी लिहिलेल्या सद्गुरु आत्माराम महाराज यांच्या चरित्रांतून सर्वसामान्यांना आत्मोद्धाराचा मार्गही दाखवून देतात. स्मरणिकेतील लेखन कीर्तनकार संमेलनाच्या निमित्ताने झालेले असले तरी त्यातून नारदांपासून सुरू झालेल्या कीर्तन परंपरेची तपशीलवार

माहिती ते वाचकांना देतात. ज्ञानाचा स्फोट घडवून आणणारी अनेक साधने व माध्यमे निर्माण झालेल्या आजच्या विज्ञानयुगातही कीर्तनाचे महत्त्व काय आहे, हे वाचकांना पटवून देतात. कीर्तनकारांपुढे श्रोतृवर्ग असल्याने त्याला सहजपणे आकलन होईल अशा सुबोध भाषेत कीर्तनकाराला आपला आशय मांडावा लागतो. श्री. मडगांवकरांच्या लेखनाची भाषाही श्रोत्यांना सहजपणे कळेल अशी सुबोध आहे. हा सुबोधपणा आत्माराम महाराजांच्या चरित्रातील पद्यलेखनात जसा दिसतो तसा संस्कृत श्लोकांच्या मराठी अनुवादातूनही दिसतो. संस्कृतवरील त्यांचे प्रभुत्व जसे त्यांच्या लेखनाहून दिसते त्याचप्रमाणे त्यांचा व्यासंग, बहुश्रुतपणा, लोकोद्धाराची तळमळ, विनयशीलता आणि श्रद्धाभाव यांचाही प्रत्यय येतो.

म्हणूनच श्री. मडगांवकरबुवांनी केलेली लेखन अल्प असले तरी वाचक-श्रोत्यांच्या दृष्टीने मार्गदर्शक व मोलाचे ठरणारे आहे.

***


*With Best Compliments From :*

CORPORATION OF THE CITY OF PANAJI

**Vaideshi Vivek Naik**
**Councillor-Ward No. 12**

H-2, Gharse Tower, M. G. Road,
Opp. Don Bosco High School, Panaji,
Goa - 403 001. India
Tel. : 91-832-2427882,
Mob. : 91-9890543965

*With Best Compliments From :*

**SAMRAJ CONSTRUCTION**
**(Civil Engineer & Constractor)**
'Sulochana', H. No. 405/1,
Near Karnataka Bank, Alto
Porvorim - Goa Ph. 2412264 (R)

**SAMRAJ ENTERPRISES**
Manufactures & Suppliers of Neeru bags (Lime Powder) Hydrated lime & Allumina Ferric
Fact. : Plot No. : 99 Pilerne Ind. Estate,
P. O. Saligao Bardez Goa. 403511